पुण्य नगरी

# घुले महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, नलोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयतील वाबळे संभाजी शिवाजी व अंधारे तृप्ती प्रदीप, या दोन कबड्डी खेळाडूंची सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ पुणे संघात निवड झाली आहे.





मुलांच्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा दुर्गावती विश्वविद्यालय जबलपूर, या ठिकाणी होणार आहेत तसेच मुलींच्या कबड्डी स्पर्धा संत गाडगेबाबा, अमरावती विद्यापीठ अमरावती महाविद्यालयात होणार आहेत.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील, सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील, मा. जिल्हा परिषद अध्यक्षा सौ.राजश्रीताई घुले पाटील, मा.पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Smart Ahmednagar Edition

पुढारी

## संक्षिप्त



**सोनई : नागेबाबा सुरक्षा कवच अंतर्गत सभासदास अपघाती विमा रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आले.** (छाया : सुनील दरंदले)

### सभासदांना अपघाती विमा धनादेश

**सोनई :** नेवासा तालुक्यातील श्री संत नागेबाबा मल्टिस्टेट या संस्थेच्या वडाळा बहिरोबा येथील शाखेतील खातेदार तुकाराम विठ्ठल मोटे यांना नागेबाबा सुरक्षा कवच विमा योजनेंतर्गत १४ हजार ८२० रूपये व बाबासाहेब नारायण पतंगे यांना २६ हजार १०० रूपयांचा अपघाती विमा दवाखाना खर्चाचा धनादेश संस्थेच्या वतीने देण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कडुभाऊ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागेबाबा सुरक्षा कवच योजना सुरू करून फक्त ७०० रुपयांमध्ये १० लाख रुपयांचा अपघाती विमा, ५ लाखांपर्यंत हॉस्पिटल खर्च सभासदांना दिला जातो. यावेळी महेश मोटे, राहुल मोटे, ललित मोटे, बाबासाहेब मोटे, मॅनेजर जीवन आगळे, संस्थेचे खातेदार, शाखेचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मॅनेजर आगळे यांनी सोने तारण, स्मार्ट कार्ड, वृक्षमित्र पुरस्कार, महिला बचत गटांना कर्ज वाटप आदी योजनांची माहिती दिली.

### वसतिगृहातील मुलांना ब्लँकेट वाटप

**भातकुडगाव :** दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी मुलांचे वसतिगृहातील मुलांना हिवाळी वातावरणात स्वयंसेवकांनी स्वखर्चाने ब्लँकेट वाटप उपक्रम राबविला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद कोलते, स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गायकवाड यांनी केले. आभार प्रा. नवनाथ वारूळे यांनी मानले. कार्यक्रमास वसतिगृहाचे प्रा.मतकर, महाविद्यालयाचे प्रा.संदीप नलावडे, अक्षय काळे, रामेश्वर वाघमारे, महादेव म्हस्के, बाळासाहेब साबळे, प्रा.पूजा बोरुडे, स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते.



**भातकुडगाव : छत्रपती शिवाजी मुलांचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप करताना प्राचार्य व इतर.** (छाया : शंकर मरकड)

# वसतिगृहातील मुलांना ब्लँकेट वाटप

**भातकुडगाव :** दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने येथील छत्रपती शिवाजी मुलांचे वसतिगृहातील मुलांना हिवाळी वातावरणात स्वयंसेवकांनी स्वखर्चाने ब्लँकेट वाटप उपक्रम राबविला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद कोलते, स्वयंसेवक, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना विभाग कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गायकवाड यांनी केले. आभार प्रा. नवनाथ बारूळे यांनी मानले. कार्यक्रमास वसतिगृहाचे प्रा.मतकर, महाविद्यालयाचे प्रा.संदीप नलावडे, अक्षय काळे, रामेश्वर बाघमारे, महादेव म्हस्के, बाळासाहेब साबळे, प्रा.पूजा बोरुडे, स्वयंसेवक, स्वयंसेविका उपस्थित होते.



**भातकुडगाव : छत्रपती शिवाजी मुलांचे वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप करताना प्राचार्य व इतर.** (छाया : शंकर मरकड)

Ahmednagar Edition
Nov 20, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# एन एस एस माणुसकी शिकवते - प्राचार्य डॉ. कोलते

## दहिगाव-ने घुले पाटील महाविद्यालय एन एस एस विभाग उपक्रम ; वस्तीगृह मुलांना ब्लँकेट वाटप

भाविनिमगाव : प्रतिनिधी

--------

दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने १४ नोव्हेंबर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त व बाल दिनानिमित्त गरजू मुलांना दहिगाव ने येथील छत्रपती शिवाजी मुलांचे वस्तीगृह येथे मायेची उब म्हणून ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शरद कोलते हे होते, आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य कोलते यांनी एन.एस.एस समाजात माणूस म्हणून जगण्याचे शिकव असल्याचे सांगितले. त्याचबरोबर स्वयंसेवकांनी स्वखर्चाने जो उपक्रम राबवला तो अत्यंत स्तुत्य आहे. स्वर्गीय मारुतराव घुले पाटील यांची शिकवण हळूहळू समाजातील प्रत्येक युवकांमध्ये रुजू लागल्याचे दिसते आणि यातूनच जागरूक नागरिक तयार होतील असे सांगितले. याप्रसंगी अध्यक्षांच्या व स्वयंसेवकांच्या हस्ते ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गायकवाड यांनी केले. आभार प्रा. नवनाथ वारूळे यांनी मानले.कार्यक्रमास वस्तीगृहाचे मतकर महाविद्यालयाचे प्राध्यापक सर्व श्री संदीप नलावडे, नवनाथ वारुळे, अक्षय काळे, रामेश्वर वाघमारे, महादेव म्हस्के, बाळासाहेब साबळे, प्राध्यापिका पूजा बोरुडे. व स्वयंसेवक स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दहिगाव-ने येथील वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना ब्लँकेट वाटप करताना घुले पाटील महाविद्यालय प्राचार्य डॉ. शरद कोलते व एन एस एस प्रमुख प्रा. अमोल गायकवाड व विद्यार्थी. ( छाया : शंकर मरकड )

## दहिगाव-ने घुले पाटील महाविद्यालयाचे विद्यार्थी

# संभाजी वाबळे, तृप्ती अंधारे पुणे विद्यापीठ कबड्डी संघात

जल भूमी भाविनिमगाव : प्रतिनिधी

जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगावने संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे विद्यार्थी कबड्डी खेळाडू संभाजी शिवाजी वाबळे आणि तृप्ती प्रदीप अंधारे या दोन खेळाडूंची सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे संघात निवड झाली आहे. या खेळाडूंचा समावेश असलेल्या पुढील मुलांच्या स्पर्धा पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा राणी दुर्गावती विश्वविद्यालय जबलपूर येथे तर मुलींच्या कबड्डी स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती महाविद्यालय येथे होणार आहेत. दोन्ही खेळाडू निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र घुले पाटील, सचिव चंद्रशेखर घुले पाटील, जि. परिषद अध्यक्ष सौ.राजश्रीताई घुले पाटील, सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ. शरद कोलते तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक व प्रशासकीय सेवक वृंद यांनी अभिनंदन केले.या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. या अगोदर हि या दोन्ही खेळाडूंनी आपल्या खेळाच्या जोरावर विभागीय व आंतरविभागिय स्तरावर उत्कृष्ट खेळ करत आपल्या विद्यालयाला व स्वतःला सिद्ध केले आहे. पुणे विद्यापीठ कबड्डी संघात स्थान मिळवून पुन्हा एकदा या खेळाडूंनी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. महाविद्यालय सहकारी विद्यार्थी व पालक वर्गातुन अभिनंदन केले जाते आहे.





पुढारी

# संभाजी वाबळे, तृप्ती अंधारे कबड्डी संघात





**भातकुडगाव :** लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे विद्यार्थी खेळाडू संभाजी शिवाजी वाबळे आणि तृप्ती प्रदीप अंधारे या दोन खेळाडूंची सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे संघात निवड झाली. या खेळाडूंचा समावेश पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा राणी दुर्गावती विश्वविद्यालय जबलपूर येथे तर मुलींच्या कबड्डी स्पर्धा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती महाविद्यालय येथे होणार आहेत. दोन्ही खेळाडू निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र घुले पाटील, सचिव चंद्रशेखर घुले पाटील, जि. प. माजी अध्यक्षा राजश्री घुले पाटील, सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ. शरद कोलते, तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक व प्रशासकीय सेवक वृंदांनी अभिनंदन केले.या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. या अगोदरही या दोन्ही खेळाडूंनी आपल्या खेळाच्या जोरावर विभागीय व आंतरविभागीय स्तरावर उत्कृष्ट खेळ करीत आपल्या विद्यालयाला व स्वतःला सिद्ध केले.

Ahmednagar Edition
Nov 19, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे : डॉ. पाटेकर



**दहिगाव-ने । वीरभूमी -**

स्पर्धेच्या युगात नवीन संधीचा उपयोग करणे गरजेचे आहे तसेच नवीन बदल आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपल्या समोरील आव्हाने पेलावे, असे प्रतिपादन पुणे येथील एमकेसीएल वरिष्ठ व्यवस्थापक डॉ. दिपक पाटेकर यांनी केले.

दहिगांव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय संगणक विभाग आयोजित इ.१०वी, १२ वी व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'तंत्रज्ञानाच्या नवीन वाटा' या विषयावर मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. दिपक पाटेकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी श्री. के. वाय. नजन हे होते. यावेळी गणेशराव आठरे, जिल्हा समन्वयक एमकेसीएल अहमदनगर व डॉ. शिरीष लांडगे, प्राचार्य डॉ.शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले तसेच विष्णुपंत जगदाळे, सतीश धोंडे, उपप्राचार्य शंकर कांबळे, पर्यवेक्षक सुनिल शिंदे, डॉ.निलेश खरात, रवींद्र तांगडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ.दिपक पाटेकर म्हणाले की, संगणकाचे ज्ञान मिळविणे महत्त्वाचे आहे. येत्या काळातील डिजिटल बदल लक्षात घेऊन आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. कौशल्य आधारित शिक्षण घेणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचे योग्य तंत्र शिकणे, मुलाखतीसाठी विविध कोर्सेस ऑनलाईन आहे या सर्वांची माहिती असणे आवश्यक आहे. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक-प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र नाबदे व धनंजय घुले यांनी केले तर महेंद्र तांबे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे : डॉ. पाटेकर

**एरंडगाव :** स्पर्धेच्या युगात नवीन संधीचा उपयोग करून नवीन बदल आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपल्यासमोरील आव्हाने पेलली पाहिजेत, त्यासाठी संगणकाचे ज्ञान मिळविणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. दीपक पाटेकर, वरिष्ठ व्यवस्थापक एमकेसीएल पुणे, यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाच्या नवीन वाटा, या विषयावर आयोजित मार्गदर्शन शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन होते. प्रमुख पाहुणे म्हणनू वरिष्ठ व्यवस्थापक एमकेसीएल पुणे, गणेशराव आठरे, जिल्हा समन्वयक एमकेसीएल अहमदनगर, डॉ. शिरीष



लांडगे, अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ पुणे आदी होते.

व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले, विष्णुपंत जगदाळे, सतीश धोंडे, उपप्राचार्य शंकर कांबळे, पर्यवेक्षक सुनल शिंदे, डॉ. नीलेश खरात, रवींद्र तांगडे आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना डॉ. दीपक पाटेकर म्हणाले, स्पर्धेच्या युगात नवीन संधीचा उपयोग करावा तसेच नवीन बदल आत्मसात करून विद्यार्थ्यांनी आपल्यासमोरील आव्हाने पेलली पाहिजेत, त्यासाठी संगणकाचे ज्ञान मिळविणे महत्त्वाचे आहे. आगामी काळातील डिजिटल बदल लक्षात घेऊन आपली मानसिकता बदलणे आवश्यक असून, कौशल्य आधारित शिक्षण घेणे गरजेचे आहे. योग्य तंत्रज्ञ शिकणे, मुलाखतीसाठी विविध कोर्सेस ऑनलाईन आहे, या सर्वांची माहिती असणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

के.वाय.नजन यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनाने दिलेल्या संगणक केंद्राची मदत घेऊन विद्यार्थ्यांनी संगणक साक्षर व्हावे. काळाबरोबर आपल्यात बदल घडवा, येणारे जग स्पर्धेचे असून, या स्पर्धेत आपण टिकून राहण्यासाठी संगणक तंत्रज्ञानाची ओळख करून घ्या, असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

या वेळी डॉ.शिरीष लांडगे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र नाबदे व धनंजय घुले यांनी केले. महेंद्र तांबे यांनी आभार मानले.

स्मार्ट अहमदनगर आवृत्ती

पुण्य नगरी

# डॉ. कलाम यांची जयंती साजरी



**एरंडगाव** : शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ,राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने देशाचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ, मिसाईल मॅन, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणादिन म्हणून साजरी करण्यात आली.या वेळी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, इन्चार्ज डॉ. निलेश खरात तसेच सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

स्मार्ट अहमदनगर आवृत्ती

# घुले पाटील महाविद्यालयाचा मुलींचा कबड्डी संघ विजयी



**सार्व मंथन** **शेवगाव ११ ।** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय येथील मुलींचा कबड्डी संघ जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडा येथे आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत श्रीगोंदा संघाला ३५ गुणांनी पराभूत करत प्रथम विजेतेपद मिळवले व पाच वर्षाची विजयाची परंपरा कायम ठेवली. विजयी संघातील चार खेळाडूंची अनुक्रमे कु.अंधारे तृप्ती, लोखंडे सुवर्णा, हागे स्वाती, ढवळे साक्षी यांची के.एच.आव्हाड महाविद्यालय चांदवड नाशिक येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नरेंद्र घुले, सचिव मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील, मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मा.ना.सौ.राजश्रीताई घुले पाटील, मा.पंचायत समिती सभापती डॉ.क्षितिज घुले पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले, पत्रकार शंकरराव मरकड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवक वृंद यांनी अभिनंदन केले. या विजयी संघास शारीरिक शिक्षक संचालक प्रा.बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

# घुले महाविद्यालयाचे कबड्डीत स्पर्धेत यश




**एरंडगाव** : शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील मुलींचा कबड्डी संघाने भेंडा येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत यश मिळवले आहे.

मुलींच्या या संघाने श्रीगोंदा संघाला ३५ गुणांनी पराभूत करत प्रथम विजेतेपद मिळवले व पाच वर्षांची विजयाची परंपरा कायम ठेवली. विजयी संघातील चार खेळाडूंची अनुक्रमे अंधारे तृप्ती, लोखंडे सुवर्णा, हागे स्वाती, ढवळे साक्षी यांची के.एच.आव्हाड महाविद्यालय, चांदवड नाशिक येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील, सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील,मा. जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. राजश्रीताई घुले पाटील, मा. पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले, पत्रकार शंकरराव मरकड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांनी अभिनंदन केले आहे. या विजयी संघास शारीरिक शिक्षक संचालक प्रा. बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्मार्ट अहमदनगर आवृत्ती
11 ऑक्टोबर 2022 पृष्ठ क्रमांक 2

पुढारी

पत्रकार शंकर मरकड

## संक्षिप्त




# घुले महाविद्यालय मुलींचा संघ विजयी

**भातकुडगाव :** लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या मुलींचा कबड्डी संघ सलग पाचव्या वर्षीही विजेता ठरला आहे. भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयात आयोजित कबड्डी स्पर्धेत श्रीगोंदा येथील जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या संघास ३५ गुणांनी पराभूत करत विजेतेपद मिळविले या विजयी संघातील तृप्ती अंधारे, सुवर्णा लोखंडे, स्वाती हागे, साक्षी ढवळे या चार खेळाडूंची के.एच.आव्हाड महाविद्यालय चांदवड, नाशिक येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र घुले, सचिव चंद्रशेखर घुले, माजी अध्यक्ष राजश्री घुले, सभापती डॉ. क्षितिज घुले, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ. शरद कोलते आदींनी विजयी संघाचे अभिनंदन केले. प्रा.बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Ahmednagar Edition
Oct 11, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुण्य नगरी

# घुले महाविद्यालयाचे कबड्डीत स्पर्धेत यश




**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील मुलींचा कबड्डी संघाने भेंडा येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेत यश मिळवले आहे.

मुलींच्या या संघाने श्रीगोंदा संघाला ३५ गुणांनी पराभूत करत प्रथम विजेतेपद मिळवले व पाच वर्षांची विजयाची परंपरा कायम ठेवली. विजयी संघातील चार खेळाडूंची अनुक्रमे अंधारे तृप्ती, लोखंडे सुवर्णा, हागे स्वाती, ढवळे साक्षी यांची के.एच.आव्हाड महाविद्यालय, चांदवड नाशिक येथे होणाऱ्या आंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ. नरेंद्र घुले पाटील, सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील,मा. जिल्हा परिषद अध्यक्ष सौ. राजश्रीताई घुले पाटील, मा. पंचायत समिती सभापती डॉ. क्षितिज घुले पाटील, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले, पत्रकार शंकरराव मरकड तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवकांनी अभिनंदन केले आहे. या विजयी संघास शारीरिक शिक्षक संचालक प्रा. बाळासाहेब साबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

Smart Ahmednagar Edition
Oct 11, 2022 Page No. 02
Powered by : eReleGo.com

# राष्ट्रीय सेवा योजनेतुन सामाजिक बांधिलकीची जोपासना – डॉ.शरद कोलते

## दहिगाव-ने घुले पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा



दहिगावने येथील घुले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रम प्रसंगी स्वयंसेवक विद्यार्थी व शिक्षक ( छायाचित्र – शंकर मरकड )

**दहिगाव-ने : प्रतिनिधी**

- - - - - - - - - - - - -

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जोपासून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवला जातो असे असे प्रतिपादन दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते यांनी केले. शेवगाव तालुक्यातील जनता शिक्षण प्रसारक मंडळ दहिगाव- ने संचलित,लोकनेते मारूतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उद्घाटन समारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते व प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगाव-ने डॉ.कैलास कानडे यांच्या हस्ते संपन्न झाला.या कार्यक्रमाचे औचित्य साधून डॉ.कैलास कानडे यांनी विद्यार्थिनींना माता सुरक्षित घर सुरक्षित या अभियाना अंतर्गत युवतींनी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम कसे व्हावे याबद्दल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.शरद कोलते होते.या कार्यक्रमास प्राध्यापक सर्वश्री रवींद्र गायकवाड,अमोल गुंड,अक्षय काळे,गणेश वीर,महादेव म्हस्के, दिपक देवकर,गणेश आगळे,श्रीराम देशपांडे,रामेश्वर वाघमारे, बाबासाहेब घुले,प्राध्यापिका सोनाली वांढेकर, यशोदा निळ, सुनिता गाडेकर,पूजा बोरुडे तसेच विद्यार्थी स्वयंसेवक स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा.अमोल गायकवाड यांनी केले तर सूत्रसंचालन कृष्णा माताडे यांनी केले. आभार प्रा.नवनाथ वारुळे यांनी मानले.

पुण्यनगरी



# घुले पाटील महाविद्यालयात नेत्रतपासणी शिबीर

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात शिक्षण महर्षी स्व. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या जयंतीनिमित्त मोफत कॉम्प्युटरद्वारे नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन व स्व. घुले यांच्या प्रतिमेचे पूजन दहिगाव-ने चे सरपंच सुभाष नाना पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, डॉ.ऋषिकेश शिंदे, सेवा सोसायटीचे चेअरमन शब्बीरभाई शेख ,विलासराव लोखंडे, बाळासाहेब मरकड, सुरेश घाणमोडे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते,नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात एकूण २०५ रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली.

Smart Ahmednagar Edition
Sep 16, 2022 Page No. 03
Powered by : erelego.com

# घुले पाटील महाविद्यालयात मोफत नेत्र तपासणी शिबिर

जलभूमी

**भाविनिमगाव : प्रतिनिधी**

---------------

दहिगाव-ने ता. शेवगाव येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात शिक्षण महर्षी स्व. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या ९२ व्या जयंतीनिमित्त मोफत कॉम्प्युटर द्वारे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन



करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन व स्वर्गीय साहेबांच्या प्रतिमेचे पूजन दहिगाव-ने सरपंच सुभाष पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, डॉ. ऋषिकेश शिंदे, सोसायटी चेअरमन शब्बीरभाई शेख , विलासराव लोखंडे ,बाळासाहेब मरकड ,सुरेश घाणमोडे ,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते, प्राचार्य अशोक उगलमुगले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.या शिबिरामध्ये एकूण २०५ जणांनी नेत्र तपासणी केली.

# डॉ. निलेश खरात पीएच.डी. मार्गदर्शक



जलभूमी भाविनिमगाव : प्रतिनिधी

------------

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय,दहिगाव-ने येथील उपप्राचार्य प्रा.डॉ.निलेश खरात यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे. जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नरेंद्र घुले पाटील , सचिव मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील ,प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते व सा.फु. पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.शिरीष लांडगे तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यांनी अभिनंदन केले.

पुण्य नगरी

# व्यावसायिक शिक्षण काळाची गरज : जिवडे

**एरंडगाव :** सध्याच्या स्पर्धेच्या युगात व्यावसायिक शिक्षण ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी तात्यासाहेब जिवडे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत समारंभ व विद्यार्थ्यांना विविध उद्योगासंदर्भात प्रशिक्षण व शासकीय योजनेसंदर्भात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, या वेळी जिवडे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते होते. प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी तात्यासाहेब जिवडे होते. याप्रसंगी त्यांनी व्यावसायिक शिक्षण काळाची गरज, या विषयावर मार्गदर्शन करतानाच उद्योगाच्या संधी, त्यामध्ये येणाऱ्या अडचणी व युवा उद्योजक तयार होण्याकरता सरकार राबवत असलेल्या विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी, संस्थेचे अध्यक्ष मा. आ. डॉ.नरेंद्र घुले पाटील तसेच सचिव चंद्रशेखर घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना महाविद्यालयात सुरू करण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक कोर्सेससंदर्भात मार्गदर्शन करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यास प्रेरित केले. या वेळी महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक सर्वश्रीः विकास थोरात, अमोल गुंड, नवनाथ वारुळे, अक्षय काळे, श्रीराम देशपांडे, अमोल गायकवाड, रामेश्वर वाघमारे, महादेव म्हस्के, गणेश आगळे, गणेश वीर, प्रवीण आगळे, रवींद्र तांगडे, यशोदा निळ, पूजा बोरुडे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.धनंजय घुले यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी दिव्या कापरे व कृष्णा माताडे यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.


(छाया : प्रविण खोमणे)

पराक्रमी

# व्यावसायिक शिक्षण काळाची गरज- तात्यासाहेब जीवडे




**दैनिक पराक्रमी**

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थी स्वागत समारंभ व विद्यार्थ्यांना विविध उद्योगासंदर्भात प्रशिक्षण व शासकीय योजनेच्या संदर्भात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते तर प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी श्री. तात्यासाहेब जीवडे हे होते.याप्रसंगी त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उद्योगाची संधी,त्यामध्ये येणाऱ्या अडचणी व युवा उद्योजक तयार होण्याकरता सरकार राबवत असलेल्या विविध शासकीय योजना यासंदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.शरद कोलते यांनी संस्थेचे अध्यक्ष मा.आ.डॉ.नरेंद्रजी घुले पाटील तसेच सचिव चंद्रशेखरजी घुले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना महाविद्यालयात सुरु करण्यात येणाऱ्या विविध व्यावसायिक कोर्सेस संदर्भात मार्गदर्शन करून स्वतःच्या पायावर उभे राहण्यास प्रेरित केले. यावेळी महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते गुलाब पुष्प व पेन देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक सर्वश्री विकास थोरात, अमोल गुंड, नवनाथ वारुळे,अक्षय काळे, श्रीराम देशपांडे, अमोल गायकवाड, रामेश्वर वाघमारे, महादेव म्हस्के, गणेश आगळे, गणेश वीर, प्रवीण आगळे,रवींद्र तांगडे, यशोदा निळ, पूजा बोरुडे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.धनंजय घुले यांनी तर सूत्रसंचालन कुमारी दिव्या कापरे व कृष्णा माताडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.आप्पासाहेब खंडागळे यांनी मानले.

# दहिगाव-नेत हर घर तिरंगा अभियान

**दहिगाव-ने :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'हर घर तिरंगा' या अभियानाद्वारे जास्तीत जास्त घरावर तिरंगा फडकविण्यासाठी जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते. 'हर घर तिरंगा' हा उपक्रम देशभरात १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान साजरा होत आहे. त्या उद्देशाने दहिगाव-ने येथे नागरिकांमध्ये जागृती करण्यासाठी प्राचार्य डॉ.शरद कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली या फेरीचे आयोजन करण्यात आले होते. या फेरीत डॉ.नीलेश खरात, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल गायकवाड, विद्यार्थी विकास मंडळ समन्वयक प्रा.अक्षय काळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.धनंजय घुले, आप्पासाहेब खंडागळे, महेश शेजूळ, संदीप नलावडे, बाळासाहेब निळ, प्रवीण केसभट, अरविंद शिंदे, अमोल गुंड, श्रीराम देशपांडे, गणेश वीर, नवनाथ वारुळे, बाळासाहेब साबळे, गणेश आगळे, दत्तात्रय गुंजाळ आदी प्राध्यापकांसह विद्यार्थी सहभागी झाले होते.

# दहिगावनेत लोकनेते घुले महाविद्यालयाची जनजागृती फेरी

## १३ ते १५ ऑगस्ट ऐतिहासिक दिवस

शालेय विद्यार्थी व शिक्षक, ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी यांच्या कडून हर घर तिरंगा जनजागृती करण्यात आली आहे. आज १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान घरावर तिरंगा फडकावण्याची जबाबदारी आता आपण सर्वांनी घ्यायची असुन देश कर्तव्य पार पाडायचे आहे. कारण हे तीन दिवस ऐतिहासिक ठरणार असून सुवर्णाक्षरांनी याची नोंद होणार आहे. त्याचे साक्षीदार आपण ठरणार आहोत.

**डॉ. शरद कोलते – प्राचार्य, दहिगावने लोकनेते मारुतराव घुले महाविद्यालय.**



दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले महाविद्यालय वतीने तिरंगा जनजागृती फेरी ( छायाचित्र – शंकर मरकड )

**भाविनिमगाव : प्रतिनिधी**

-----------

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्ताने जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग ,विद्यार्थी विकास मंडळ व सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ. शरद कोलते यांच्या मार्गदर्शनात 'हर घर तिरंगा' या अभियानाद्वारे दहिगाव–ने व परिसरात घरावर तिरंगा फडकवण्यासाठी जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले होते.भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. तिरंगा हा फक्त आपला राष्ट्रध्वज नसून तो प्रत्येक भारतीय नागरिकांचा मान, सन्मान आणि अभिमान आहे.सर्व नागरिकांमध्ये देशभक्तीची प्रेरणा निर्माण व्हावी यासाठी 'हर घर तिरंगा' हा उपक्रम देशभरात मोठ्या उत्साहात व दिमाखात १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान साजरा होत आहे.त्या उद्देशाने १२ ऑगस्ट रोजी दहिगाव–ने येथे नागरिकांची जनजागृती करण्या करिता महाविद्यालयाच्या वतीने या फेरीचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी गावामध्ये प्रभात फेरी दरम्यान 'हर घर तिरंगा'च्या घोषणा देत गाव व परिसर दणाणून टाकला.या प्रभात फेरीमध्ये महाविद्यालयाचे इन्चार्ज डॉ. निलेश खरात,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गायकवाड, विद्यार्थी विकास मंडळ समन्वयक प्रा.अक्षय काळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.धनंजय घुले,महाविद्यालयीन प्राध्यापक सर्वश्री आप्पासाहेब खंडागळे,महेश शेजुळ,संदीप नलावडे,बाळासाहेब निळ,प्रवीण केसभट,अरविंद शिंदे,अमोल गुंड,श्रीराम देशपांडे,गणेश वीर,नवनाथ वारुळे, बाळासाहेब साबळे,गणेश आगळे, दत्तात्रय गुंजाळ तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या फेरीमध्ये सहभागी झाले होते.

लोकमत

# कष्टाळू विद्यार्थ्यांचे भवितव्य उज्ज्वल

दहिगावने : विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटी हे गुण आत्मसात केले आणि त्याला कष्टाची जोड दिली तर अशा कष्टाळू विद्यार्थ्यांचे भवितव्य हे निश्चित उज्ज्वल असेल, असे प्रतिपादन लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले. दहिगावने (ता. शेवगाव) येथील महाविद्यालयातील तृतीय वर्ष कला, वाणिज्य व शास्त्र या वर्गाचा निरोप समारंभ कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी कोलते बोलत होते. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आलेले अनुभव आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी डॉ. नीलेश खरात, सिकंदर शेख, राजेंद्र नाबदे, अक्षय काळे, रामेश्वर वाघमारे, धनंजय घुले आदीसह शिक्षक, उपस्थित होते. विद्यार्थिनी दिव्या कापरे हिने प्रास्ताविक केले. कृष्णा माताडे याने आभार मानले.

Hello Ahmednagar
Page No. 3 Jul 18, 2022
Powered by: erelego.com

# घुले पाटील महाविद्यालयात इंग्लिश डे साजरा

**भाविनिमगाव : प्रतिनिधी**

------------

दहिगावने ता. शेवगाव येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विल्यम शेक्सपिअर जयंतीनिमित्त इंग्लिश डे साजरा करण्यात आला. यावेळी न्यू आर्टस् कॉलेज शेवगाव येथील इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.रवींद्र वैद्य प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. वैद्य यांनी इंग्रजी लिटरेचर व विल्यम शेक्सपियर यांनी इंग्रजी भाषा व साहित्य या विषयी दिलेल्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर इंग्रजी भाषेतील संभाषण कौशल्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.नीलेश खरात कार्यक्रम अध्यक्ष होते, या कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापक  उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.रामेश्वर वाघमारे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश आगळे यांनी केले तर आभार प्रा. गणेश वीर यांनी मानले.



# विद्यार्थ्यांनी शैक्षणिक हेतूने सामाजिक समस्या जवळून जाणून घेणे गरजेचे – प्राचार्य डॉ.शरद कोलते

जल भूमी

भाविनिमगाव : प्रतिनिधी

-------------

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे असलेले अवांतर सामाजिक ज्ञान असने गरजेचे आहे. त्यातही विद्यार्थ्यांना शैक्षणिक हेतूने संवेदनशील बनविण्याच्या दृष्टीने शेजारच्या समुदायला जवळून जाणून घेणे गरजेचे असल्याचे मत दहिगाव–ने लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते यांनी व्यक्त केले. दहिगावने ता. शेवगाव येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी गोदावरी तीरावर नुकतीच क्षेत्र भेट दिली . यावेळी विद्यार्थी शिक्षकांनी त्या भागातील पुनर्वसित धरणग्रस्त शेतकऱ्यांशी चर्चा केली व त्यांच्या अडचणी समजून



घेतल्या. महाविद्यालय असे उपक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत राबवित आहे . यावेळी सर्वांनी वनभोजनाचा आनंद घेतला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते. एन. एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा.अमोल गायकवाड. प्रा.विकास थोरात. प्रा.अक्षय काळे. प्रा.नवनाथ वारुळे. प्रा.अरविंद शिंदे. प्रा.गणेश वीर. प्रा.वाघमारे प्रा.अमोल गुंड. प्रा.जालिंदर चितळे. प्रा.खंडागळे. व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेविका, स्वयंसेवक उपस्थित होते.

# क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची : डॉ.कोलते



(छाया : प्रविण खोमणे)

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट जायकवाडी बॅकवॉटर (गोदाकाठ) दहिगाव-ने येथे प्राचार्य डॉ.शरद कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच संपन्न झाली.

यावेळी प्राचार्यांनी भौगोलिक, वैज्ञानिक व ऐतिहासिक घटकांचा अभ्यास करता यावा विज्ञान,भूगोल, इतिहास या विषयासाठी क्षेत्रभेट ही एक उपयुक्त अध्यापन पद्धती आहे. तसेच मानवी जीवनातील नद्यांचे महत्व याविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. यावेळी विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी वनभोजनाचा ही आनंद लुटला. यावेळी प्राचार्य डॉ.शरद कोलते, प्राध्यापक सर्वश्री आप्पासाहेब खंडागळे,अमोल गुंड,अरविंद शिंदे,गणेश विर,नवनाथ वारुळे,अमोल गायकवाड, बाळासाहेब साबळे,जालिंदर चितळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली : डॉ. लांडे

**एरंडगाव :** महात्मा फुले यांनी समाजातील वर्ग व्यवस्थेला विरोध करून सत्यशोधक समाजाची स्थापना केली, असे माहिती भेंडा येथील जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. काकासाहेब लांडे यांनी सांगितले.

शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात म. ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, उपप्राचार्य डॉ. नीलेश खरात आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. लांडे यांनी सांगितले की, महात्मा फुले यांनी समाजातील वर्ग व्यवस्थेला विरोध करून सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजात कोणीही उच्च-नीच नसून माणूस हा समान घटक आहे. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा वसा घेऊन समाजात स्त्रीला एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून दिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज स्त्री पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आपली सक्षम भूमिका बजावत आहे. हंटर कमिशनसमोर फुले यांनी सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, असा प्रस्ताव ठेवला होता, हे त्यांचे निर्णायक पाऊल होते.



(छाया : प्रविण खोमणे)

बालविवाह प्रथेला विरोध, विधवा विवाह, असे महत्त्वपूर्ण समाजसुधारणाविषयी धोरण फुले यांनी स्वीकारले. जगाचा पोशिंदा शेतकरी असून, शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे. या वेळी प्राचार्य डॉ. शरद कोलते म्हणाले, महात्मा फुले यांनी आपले संपूर्ण जीवन स्त्रियांच्या उद्धारासाठी, बहुजन समाजासाठी, कामगार व कष्टकरी वर्गासाठी खर्च केले. त्यांचे विचार आपल्या जीवन व्यवहारात आपण स्वीकारणे गरजेचे आहे. सर्व प्रगतीचे मूळ शिक्षणात असल्याने, शिक्षित व्हा, असा संदेश महात्मा फुले यांनी दिला. हा विचार आपण केंद्रस्थानी ठेवला पाहिजे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.धनंजय घुले यांनी केले. सूत्रसंचालन दिव्यांशा कापरे हिने केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.

ग्रामीण जनतेचा आवाज
जल भूमी

# फुलेंनी स्त्रीला समाजात एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन दिले – डॉ. काकासाहेब लांडे

## दहिगावने घुले पाटील महाविद्यालयात महात्मा फुले जयंती साजरी

**भाविनिमगाव : प्रतिनिधी**

-----------

बालविवाह प्रथेला विरोध, विधवा पुनर्विवाह असे महत्त्वपूर्ण समाजसुधारणा धोरण स्वीकारले. शेतकऱ्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिली.महात्मा फुले यांनी समाजातील वर्ग व्यवस्थेला विरोध करून सत्यशोधक समाजाची स्थापना केली.मानव हा एक असून त्याला सर्व हक्क मिळाले पाहिजे,कोणीही उच्च-नीच नसून माणूस हा समान घटक आहे. फुलेंनी स्त्री शिक्षणाचा वसा घेऊन समाजात स्त्रीचे एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आणि त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज स्त्री पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात आपली



सक्षम भूमिका बजावत आहे. हंटर कमिशन समोर फुले यांनी सर्वांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे हा प्रस्ताव ठेवला होता हे त्यांचे निर्णायक पाऊल होते असे प्रतिपादन जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडे येथील भूगोल विभाग प्रमुख प्रा.डॉ.काकासाहेब लांडे यांनी केले. लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने येथे महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी प्रा.डॉ.काकासाहेब लांडे यांना प्रमुख व्याख्याते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कोलते, उपप्राचार्य डॉ.निलेश खरात आदी उपस्थित होते. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.धनंजय घुले यांनी केले. सूत्रसंचालन कुमारी दिव्यांशा कापरे हिने केले तर आभार प्रा. आप्पासाहेब खंडागळे यांनी मानले.

# घुले महाविद्यालयात जागतिक आरोग्यदिन साजरा



**एरंडगाव :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात दि.७ एप्रिल २०२२ रोजी जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगाव-ने येथील आरोग्य अधिकारी व आरोग्य सेविका यांनी कोरोना काळामध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कैलास कानडे होते. अध्यक्षस्थानी नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले होते. या वेळी डॉ. कैलास कानडे यांनी सांगितले की, उत्तम आरोग्यामुळे मनुष्याचे जीवन आनंदी व कल्याणकारी होते, त्यामुळे आपण जागतिक आरोग्यदिन रोज साजरा केला पाहिजे. आरोग्यपूर्ण जीवनच मनुष्याला संकल्पपूर्तीकडे नेते. यावर्षी आपण पर्यावरण जाणीव जागृतीचा संकल्प मनी बाळगून प्रदूषणमुक्त जीवन जगण्याचा संकल्प करुया. प्राचार्य श्री. उगलमुगले यांनी कोरोना काळात डॉक्टर्स व आरोग्य कर्मचाऱ्यांनी खरोखरच देवदूतासारखे काम केले आहे. कोरोना काळात दहिगाव-ने परिसराच्या संपूर्ण आरोग्याची जबाबदारी ज्यांनी समर्थपणे सांभाळली, असे प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व डॉक्टर्स व आरोग्य सेवकांचे ऋण आपण सत्काराने फेडू शकणार नाही. आरोग्य सेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. या वेळी व्यासपीठावर डॉ. कैलास कानडे, डॉ. सुमित श्रावणे, डॉ. संजय सुकळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते, नवजीवन विद्यालयाचे प्राचार्य अशोक उगलमुगले, डॉ. निलेश खरात, गंगाधर पावळे, भाऊसाहेब आवांडकर, काशिनाथ वाघ, योगेश काळे, श्रीम. निर्मला बनसोडे, अंजली इंगळे ,सविता भारस्कर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय घुले यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# ग्रामीण विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण काळाची गरज: डॉ. घुले


(छाया : प्रविण खोमणे)

**एरंडगाव :** सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्यवसाय व नोकरीची संधी उपलब्ध व्हावी, याकरिता ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकऱ्यांच्या मुलांनी संगणक साक्षर होणे गरजेचे आहे. लोकनेते मारुतराव घुले पाटील यांनी बहुजन समाजासह गोरगरिबांच्या मुलांना शिक्षणाची सोय व्हावी, या उद्देशाने शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेची स्थापना केली. काळानुरूप शिक्षणात बदल होत असताना संगणक शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी वाढत्या स्पर्धेमध्ये टिकावा, या उद्देशाने आज दहिगाव-ने येथील शैक्षणिक संकुलात संगणक अभ्यासक्रम केर्स सुरू करण्यात आला आहे, असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितीज घुले यांनी केले.

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय व नवजीवन विद्यालय दहिगाव-ने येथे आयोजित कॉम्प्युटर कोर्स केंद्राचे उद्घाटन, विद्यार्थी बक्षीस कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलर होते. व्यासपीठावर हिंदुस्तान कॅटल फीड्स बारामतीचे पांडुरंग सातपुते, सौरभ कोते, अमोल पवार तसेच सेवा सोसायटीचे चेअरमन शब्बीर भाई शेख, व्हा. चेअरमन अशोकराव थोटे, सरपंच सुभाष नाना पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, जाधव भाऊसाहेब, जयराम नीळ, सुरेश घाणमोडे, संतोष चव्हाण, कडुबाळ घुले, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ. शरद कोलते, प्राचार्य अशोक उगलमुगले, नर्सिंगचे प्राचार्य सिनारे सर, उपप्राचार्य गणपत कणसे, पर्यवेक्षक तात्यासाहेब घुले, शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन काकासाहेब घुले, मच्छिंद्र पानकर, रमेश खैरे, मकरंद बारगुजे आदी उपस्थित होते.

या वेळी विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरव करण्यात आला. तसेच हिंदुस्तान कॅटल फीडस, बारामती यांच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक डॉ.शरद कोलते व अशोक उगलमुगले यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील व विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# आत्मभान करून देणाऱ्या मराठी चा गौरव करा - डॉ. लांडगे

# घुले पाटील महाविद्यालयात विज्ञान व मराठी भाषा गौरव दिन साजरा

भाविनिमगाव : जलभूमी वृत्तसेवा

-----------

**मराठी भाषा आपणाला आत्मभान देते आणि माणूसम्हणून मातृभाषा आपणाला जगायचे कसे हे शिकवते. संत ज्ञानेश्वर महाराजांनी प्राचीन काळापासून मराठी भाषेचा गौरव केला आहे.त्याची सुरुवात हि पैठण आणि नेवासा या भागातून झाली आहे हे आपले भाग्य आहे. म्हणून आपणच मराठीचा गौरव करणे अत्यावश्यक आहे असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.शिरीष लांडगे यांनी केले.**



दहिगाव-ने लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विज्ञान दिन कार्यक्रम प्रसंगी माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले व इतर ( छाया- शंकर मरकड )

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने येथे विद्यार्थी विकास मंडळ,विज्ञान मंडळ, व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी संस्था अध्यक्ष माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. संभाजी काळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर व्याख्याते म्हणून जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडे येथील प्रा.पांडुरंग देशमुख (विज्ञान विभाग),प्रा.डॉ. संभाजी काळे (अर्थशास्त्र विभाग), प्रा.डॉ. शिरीष लांडगे (मराठी विभाग) उपस्थित होते. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे आवश्यक असुन आपली भूमिका विज्ञान निष्ठ असले पाहिजे असे प्रतिपादन प्रा.पांडुरंग देशमुख यांनी केले. यावेळी सरपंच सुभाष पवार, सोसायटीचे चेअरमन शब्बीर शेख, उपसरपंच पाऊलबुद्धे, बाळासाहेब मरकड,विलासराव लोखंडे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ.शरद कोलते, प्राचार्य अशोक उगलमुगले,काकासाहेब घुले,डॉ. नीलेश खरात आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

# मुलींनी स्व संरक्षणाचे धडे घेणे आवश्यक: डॉ. शेख

**एरंडगाव** : आजकाल अनेक मुली शिक्षण व नोकरीसाठी बाहेर पडतात. परंतू रोज घडणाऱ्या महिला अत्याचाराच्या घटना ऐकूना मन धास्तावते. त्यामुळे आजच्या काळाची गरज म्हणून मुलींनी स्व- संरक्षणाचे धडे घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. सिकंदर शेख यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या विद्यमाने निर्भय कन्या अभियान राबवण्यात आले, या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते होते. व्यासपीठावर डॉ. नीलेश खरात, प्रा. यशोदा नीळ, सोनाली वांढेकर आदी उपस्थित होते.



(छाया: प्रविण खोमणे)

डॉ. शेखे पुढे म्हणाले, आजच्या काळाची गरज ओळखून मुलींना वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण संघटना, अहमदनगर यांच्या वतीने शिबीर आयोजित करण्याचा मानस आहे. ग्रामीण भागातील मुली शाळेत जाण्यासाठी बस, ऑटो रिक्षा, सायकल,या साधनांचा वापर करतात. अशावेळी त्यांच्यासोबत गैरप्रकार होत असतात. या कारणांमुळे अनेक मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी पाठविण्यास पालक धजावत नाहीत. परंतू मुलींनी स्व संरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण घेतल्यास त्या स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकतील. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुलींनाच स्व संरक्षणाचे धडे देण्याचे काम महिला आयोगाने हाती घेतले आहे. डॉ. कोलते यांनी सांगितले की, स्वसंरक्षण करता येणे ही मुलींसाठी काळाची गरज बनली आहे. जर मुलींना संरक्षण करता आले तर त्या कुठेही निर्भयपणे वावरू शकतात. त्यामुळे प्रत्येक मुलीने स्वसंरक्षण करायला शिकले पाहिजे. कार्यक्रमास प्राध्यापक तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा.अक्षय काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय घुले यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.

## महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगावा - प्रा.पांडुरंग देशमुख

# घुले पाटील महाविद्यालयात विज्ञान व मराठी भाषा गौरव दिन साजरा




दहिगाव-ने लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विज्ञान दिन कार्यक्रम प्रसंगी माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले व इतर ( छाया- शंकर मरकड )

**भाविनिमगाव : जलभूमी वृत्तसेवा**

-----------

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने येथे विद्यार्थी विकास मंडळ,विज्ञान मंडळ, व मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विज्ञान दिन व मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.या प्रसंगी संस्था अध्यक्ष माजी आमदार डॉ.नरेंद्र घुले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. संभाजी काळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर व्याख्याते म्हणून जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडे येथील प्रा.पांडुरंग देशमुख (विज्ञान विभाग),प्रा.डॉ. संभाजी काळे (अर्थशास्त्र विभाग), प्रा.डॉ.शिरीष लांडगे (मराठी विभाग) उपस्थित होते. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे आवश्यक असुन आपली भूमिका विज्ञान निष्ठ असले पाहिजे असे प्रतिपादन प्रा.पांडुरंग देशमुख यांनी केले. यावेळी सरपंच सुभाष पवार, सोसायटीचे चेअरमन शब्बीर शेख, उपसरपंच पाऊलबुद्धे, बाळासाहेब मरकड,विलासराव लोखंडे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन, प्राचार्य डॉ.शरद कोलते, प्राचार्य अशोक उगलमुगले,काकासाहेब घुले,डॉ. नीलेश खरात आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कोलते यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले.

पुण्य नगरी

# मुलींनी स्व संरक्षणाचे धडे घेणे आवश्यकः डॉ. शेख

**एरंडगाव :** आजकाल अनेक मुली शिक्षण व नोकरीसाठी बाहेर पडतात. परंतू रोज घडणाऱ्या महिला अत्याचाराच्या घटना ऐकूना मन धास्तावते. त्यामुळे आजच्या काळाची गरज म्हणून मुलींनी स्व- संरक्षणाचे धडे घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ. सिकंदर शेख यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळाच्या विद्यमाने निर्भय कन्या अभियान राबवण्यात आले, या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते होते. व्यासपीठावर डॉ. नीलेश खरात,



(छाया: प्रविण खोमणे)

प्रा. यशोदा नीळ, सोनाली वांढेकर आदी उपस्थित होते.

डॉ. शेखे पुढे म्हणाले, आजच्या काळाची गरज ओळखून मुलींना वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण संघटना, अहमदनगर यांच्या वतीने शिबीर आयोजित करण्याचा मानस आहे. ग्रामीण भागातील मुली शाळेत जाण्यासाठी बस, ऑटो रिक्षा, सायकल,या साधनांचा वापर करतात. अशावेळी त्यांच्यासोबत गैरप्रकार होत असतात. या कारणांमुळे अनेक मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी पाठविण्यास पालक धजावत नाहीत. परंतू मुलींनी स्व संरक्षणासाठी कराटेचे प्रशिक्षण घेतल्यास त्या स्वतःचे संरक्षण स्वतः करू शकतील. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुलींनाच स्व संरक्षणाचे धडे देण्याचे काम महिला आयोगाने हाती घेतले आहे. डॉ. कोलते यांनी सांगितले की, स्वसंरक्षण करता येणे ही मुलींसाठी काळाची गरज बनली आहे. जर मुलींना संरक्षण करता आले तर त्या कुठेही निर्भयपणे वावरू शकतात. त्यामुळे प्रत्येक मुलीने स्वसंरक्षण करायला शिकले पाहिजे. कार्यक्रमास प्राध्यापक तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा.अक्षय काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय घुले यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले.

भारतनामा
Sunday - 27 Feb 2022 - Page 3

# घुले पाटील महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान संपन्न

**भारतनामा**
**दहिगाव-ने (प्रतिनिधी)**

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या अभियान महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली.

या कार्यक्रमाला डॉ.सिकंदर शेख हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये सांगितले की, आज मुली शिक्षण व नोकरीसाठी बाहेर पडतात. वृत्तपत्रात रोज घडणा-या मुली व महिलांच्या अत्याचाराच्या घटना वाचून मन धास्तावते. त्यामुळे आजच्या काळाची गरज म्हणून मुलींनी स्व- संरक्षणाचे धडे घेणे आवश्यक ठरत आहे. स्वसंरक्षणासाठी मुलिंना वाहतुक सुरक्षा व नागरी संरक्षण संघटन अहमदनगर यांचे वतीने जिल्हापरीषद शिक्षण,पोलीस विभागाची मदत घेऊन शिबीर आयोजित करण्याचा ध्यास आसल्याचे आश्वासन दिले.

पुढे बोलताना डॉ.सिकंदर शेख म्हणाले,ग्रामीण भागातील मुली शाळेत जाण्यासाठी बस,ऑटो रिक्षा, सायकल इत्यादी साधनांचा वापर करतात.अशावेळी त्यांच्यासोबत गैरप्रकार होत असतात. या कारणांमुळे अनेक मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी पाठविण्यास पालक धजावत नाही.पण मुलींनी स्व संरक्षणाची माहीत करून घेतल्यास त्या स्वतःचे संरक्षण स्वत: करू शकतील.या एका प्रशिक्षणामुळे मुलींमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण होऊन त्या आलेल्या प्रसंगांना धाडसाने सामना करतील असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पूर्वीच्या काळातही महिला,मुली घराबाहेर पडल्यात कि त्यांना पाहून शेरेबाजी व्हायची, आणि आजही होते. याचा अनुभव प्रत्येक महिलेला आयुष्यात एकदातरी येतोच.आज ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणासाठी बाहेर पडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यांना



सुरक्षित वातावरणाची गरज आहे.पण विकृत प्रवृत्तीमुळे आज मुली,महिलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे स्वतःचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन मुलींनी कराटे प्रशिक्षण शिकून घ्यावे.संरक्षित भविष्यासाठी आज ही काळाची गरज बनली आहे.

मुलींच्या संरक्षणाची काळजी आहे म्हणून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मुलींनाच स्व संरक्षणाचे धडे देण्याचे काम महिला आयोगाने हाती घेतले आहे. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कोलते,डॉ.नीलेश खरात प्रा.यशोदा नीळ,सोनाली वांढेकर आदी उपस्थित होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात बोलताना डॉ. शरद कोलते यांनी सांगितले की,स्वसंरक्षण करता येणे ही मुलींसाठी काळाची गरज बनली आहे. जर मुलींना संरक्षण करता आले तर त्या कुठेही निर्भयपणे वावरू शकतात. त्यामुळे प्रत्येक मुलीने स्वसंरक्षण करणे शिकले पाहिजे.यासाठी स्वसंरक्षणाचे प्रत्येकीने प्रशिक्षण घेतले पाहिजे. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अक्षय काळे यांनी केले,सूत्रसंचालन प्रा. धनंजय घुले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रा.आप्पासाहेब खंडागळे यांनी मानले.

# घुले पाटील महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान संपन्न

**भारतनामा**
**दहिगाव-ने (प्रतिनिधी)**

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निर्भय कन्या अभियान महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली.

या कार्यक्रमाला डॉ.सिकंदर शेख हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानांमध्ये सांगितले की, आज मुली शिक्षण व नोकरीसाठी बाहेर पडतात. वृत्तपत्रात रोज घडणा-या मुली व महिलांच्या अत्याचाराच्या घटना वाचून मन धास्तावते. त्यामुळे आजच्या काळाची गरज म्हणून मुलींनी स्व- संरक्षणाचे धडे घेणे आवश्यक ठरत आहे. स्वसंरक्षणासाठी मुलिंना वाहतुक सुरक्षा व नागरी संरक्षण संघटन अहमदनगर यांचे वतीने जिल्हापरीषद शिक्षण,पोलीस विभागाची मदत घेऊन शिबीर आयोजित करण्याचा ध्यास आसल्याचे आश्वासन दिले.

पुढे बोलताना डॉ.सिकंदर शेख म्हणाले,ग्रामीण भागातील मुली शाळेत जाण्यासाठी बस,ऑटो रिक्षा, सायकल इत्यादी साधनांचा वापर करतात.अशावेळी त्यांच्यासोबत गैरप्रकार होत असतात. या कारणांमुळे अनेक मुलींना उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी पाठविण्यास पालक धजावत नाही.पण मुलींनी स्व संरक्षणाची माहीत करून घेतल्यास त्या स्वतःचे संरक्षण स्वत: करू शकतील.या एका प्रशिक्षणामुळे मुलींमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास निर्माण होऊन त्या आलेल्या प्रसंगांना धाडसाने सामना करतील असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

पूर्वीच्या काळातही महिला,मुली घराबाहेर पडल्यात की त्यांना पाहून शेरेबाजी व्हायची, आणि आजही होते. याचा अनुभव प्रत्येक महिलेला आयुष्यात एकदातरी येतोच.आज ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षणासाठी बाहेर पडण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यांना



सुरक्षित वातावरणाची गरज आहे.पण विकृत प्रवृत्तीमुळे आज मुली,महिलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे.त्यामुळे स्वतःचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन मुलींनी कराटे प्रशिक्षण शिकून घ्यावे.संरक्षित भविष्यासाठी आज ही काळाची गरज बनली आहे.

